जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 AUG 2017

सकाळ



कोल्हापूर : प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना अमृता भंडारे. शेजारी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. डी. आर. मोरे व अन्य मान्यवर.

# भंडारे, पाटील यांना एनएसएस पुरस्कार प्रदान

कोल्हापूर, ता. २४ : येथील शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांचे नुकतेच वितरण झाले. प्राणिशास्त्र अधिविभागाच्या अमृता भंडारे यांना विद्यापीठस्तरीय व जिल्हास्तरीय प्रथम क्रमांक मिळाला, तर इतिहास विभागाच्या प्रियांका पाटील यांना जिल्हास्तरीय द्वितीय पुरस्कार मिळाला.

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रमुख पाहुणे माजी बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते त्यांना गौरवण्यात आले. सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व छत्रपती शाहू महाराज चरित्र ग्रंथ असे पुरस्काराचे स्वरूप होते.

राष्ट्रीय सेवा योजनाचे संचालक व समन्वयक प्रा. डॉ. डी. के. गायकवाड यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. एनएसएस विद्यापीठ विद्यार्थी प्रतिनिधी संग्राम मोरे, सुजित मुंडे उपस्थित होते.

अमृता यांना यापूर्वी एनएसएसचाच राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यांना प्राणिशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत, कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. एस. एम. गायकवाड यांचे प्रोत्साहन लाभले. प्रियांका यांना यापूर्वी महाराष्ट्र शासनाचा राज्य युवा पुरस्कार मिळाला आहे. त्यांना इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. नंदा पारेकर, प्रा. डॉ. अवनिश पाटील, प्रा. निलांबरी जगताप, प्राचार्य राजेंद्र लोखंडे, उमेश भोसले यांचे प्रोत्साहन लाभले.

2 5 AUG 2017 तरूण भारत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदवीधर नोंदणी अर्जांची छाननी प्रक्रिया पूर्ण

## विद्यार्थी कल्याण मंडळ निवडणूक : १४,५०० अर्ज पात्र

प्रतिनिधी
कोल्हापूर

नवीन विद्यापीठ कायद्यानुसार विद्यापीठ निवडणूक प्रक्रिया राबवली जाणार आहे. पदवीधर नोंदणी अर्जांची छाननी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. १४ हजार ५०० अर्ज पात्र ठरले आहेत. पुढच्या आठवड्यात कच्ची यादी जाहीर होणार असून, या यादीसंदर्भात आलेल्या तक्रारींचे निरसन केल्यानंतरच निवडणूक कार्यक्रम जाहीर होणार आहे. तर विद्यार्थी कल्याण मंडळाच्या निवडणुका घेण्यासाठी राज्यशासनाकडून अजून 'परिनियम'च आलेले नाहीत. विद्यापीठ प्रशासन विद्यार्थी कल्याण मंडळाच्या निवडणूक 'परिनियमां'च्या प्रतीक्षेत आहेत.

२०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील सर्व परिषदांसाठीचे परिनियम विद्यापीठांना प्राप्त झाले आहेत. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम २७ नुसार कुलपतींच्या मान्यतेने प्राधिकरणाचा सदस्य म्हणून निवडून येण्यासाठीची पात्रता प्रसिद्ध केली आहे. यामध्ये प्राचार्य, प्राध्यापक, विद्यापीठ अध्यापक, नोंदणीकृत पदवीधर (कलम २), व्यवस्थापन परिषद (कलम ३०), विद्यापरिषद (कलम ३२) , अभ्यास मंडळ (कलम ४०), अधिसभा (कलम २८), विद्याशाखा (कलम ३४), विद्यापीठ विभाग आणि आंतरविद्याशाखीय अभ्यासमंडळ (कलम ४२), महाविद्यालयीन पदव्युत्तर शिक्षण मंडळ (कलम ४४), आजीवन अध्ययन व विस्तार मंडळ परीक्षा व मूल्यमापन मंडळ (कलम ४७), माहिती तंत्रज्ञान मंडळ (कलम ४९), राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सहचर्य मंडळ (कलम ५१), नवोपक्रम, नवसंशोधन व उपक्रम मंडळ (कलम ५३), विद्यार्थी विकास मंडळ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ (कलम ५०), संशोधन मंडळ (कलम ५९) या १५ मुख्य पदांच्या व इतर पदांसाठी घेण्यात येणाऱ्या निवडणूक कार्यक्रम पुढच्या आठवड्यात जाहीर होणार आहे. तरीदेखील २६१ महाविद्यालयांपैकी १४८ महाविद्यालयांनी प्राध्यापक, प्राचार्य, कर्मचाऱ्यांची माहिती दिली आहे. तर ११३ महाविद्यालयांनी अजून माहिती दिलेली नाही. या महाविद्यालयांची माहिती गोळा करण्याचे काम सुरू आहे. विद्यापीठ प्रशासनाने चार वेळा मुदतवाढ देवूनसुध्दा महाविद्यालयांनी माहिती सादर केलेली नाही. त्यामुळे महाविद्यालयांना नोटिसा पाठवल्या जात आहेत.



### नोंदणीकृत सर्व पदवीधरांना मताचा अधिकार मिळणार

शिवाजी विद्यापीठ नोंदणीकृत ज्या पदवीधरांचा अर्ज अवैध ठरला असेल त्या पदवीधरांनाही मतदानाचा अधिकार दिला जाणार आहे. या निर्णयामुळे पदवीधरांसह विद्यार्थी संघटनांना दिलासा मिळणार असून, संघटनांनी केलेल्या आंदोलनाला यश आल्याची प्रतिक्रिया विद्यार्थी संघटनांच्या प्रतिनिधींनी दिली. पदवीधर अवैध अर्जांची जवळपास ५ हजार संख्या आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 AUG 2017
महाराष्ट्र टाईम्स

# किरण गुरव यांना जैन फाउंडेशनचा पुरस्कार



**कोल्हापूर :** येथील साहित्यिक व शिवाजी विद्यापीठातील अधीक्षक किरण अनंत गुरव यांना जळगाव येथील भंवरलाल अँड कांताबाई जैन फाउंडेशनचा सन २०१६-१७चा ना. धों. महानोर सर्वोत्कृष्ट गद्यलेखन पुरस्कार जाहीर झाला आहे. सन्मानचिन्ह, गौरवपत्र आणि रोख ५१ हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरुप आहे. ६ सप्टेंबर रोजी जळगावच्या जैन हिल्स येथील कस्तुरबा सभागृहात पुरस्कार वितरण होईल.

गुरव यांचे 'राखीव सावल्यांचा खेळ' आणि 'श्रीलिपी' हे दोन कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. 'राखीव सावल्यांचा खेळ' या कथासंग्रहास विविध पुरस्कार मिळाले आहेत. त्यांच्या 'वडाप' या कथेचा शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए.-भाग १च्या मराठी पाठ्यपुस्तकात समावेश करण्यात आला आहे.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, मराठी विभागप्रमुख डॉ. राजन गवस यांनी गुरव यांनी त्यांचे अभिनंदन केले.